# मिरा भाईंदर महानगरपालिका

**माहिती व जनसंपर्क विभाग**

**प्रसिद्धीपत्रक**

घोडबंदर - ठाणे दरम्यान घाट रस्त्याच्या दुरुस्तीकरणाचे काम मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत दि. 8 ऑगस्ट 2025 रोजी रात्री 12.01 वाजल्यापासून ते दि. 10 ऑगस्ट 2025 रोजी मध्यरात्रीपर्यंत करण्यात येणार आहे. रस्त्यांचे दुरुस्ती काम करताना महानगरपालिकेमार्फत सदर ठिकाणी अग्निशमन वाहने, ॲम्बुलन्स ठेवण्याची व्यवस्था केली आहे. सदर दुरुस्तीचे काम हे खडीकरण, ग्राऊंटींगद्वारे करण्यात येणार असून तदनंतर मास्टिक ॲस्फाल्ट चे काम करण्यात येणार आहे. सदर रस्ता हा राष्ट्रीय महामार्ग क्र. 48 पालघर - विरारहून ठाणे – जे.एन.पी.टी. – पुणेच्या दिशेने जाण्यासाठी प्रमुख मार्ग असून मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असते. सदर रस्त्याच्या दुरुस्ती कामासाठी मीरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाने दिनांक 5 ऑगस्ट 2025 रोजी अधिसूचना काढून जड वाहनांना प्रवेश बंदी केली आहे.

वसई-विरार, पालघरहून मुंबई व ठाण्याच्या दिशेने जाण्यासाठी वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असल्याने वाहनांना पोहोचण्यासाठी वेळ लागणार आहे. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने भाईंदर ते वसई दरम्यान रो-रो सेवा सुरू केली आहे. दि. 8 ऑगस्ट 2025 ते 10 ऑगस्ट 2025 पर्यंत वसई ते भाईंदर दरम्यान रो-रो सेवेच्या फेऱ्या वाढविण्याबाबत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना कळविण्यात आले होते त्यानुसार त्यांनी रो-रोसेवेच्या फेऱ्यांमध्ये वाढ करून सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. कृपया नागरिकांनी याची नोंद घ्यावी.